जा.क्र. जि.प.मु.सा./ ५६ /२०२२
जि.प. मुद्रणालय सातारा

जावक क्रमांक :

दिनांक : १२/१२/२०२२

## दरपत्रक नोटीस

प्रति

**विषय : जिल्हा परिषद मुद्रणालयामधील बायडींगची कामे करणेसाठी दरपत्रक मिळणेबाबत...**

महोदय

सातारा जिल्हा परिषद मुद्रणालयास विविध प्रकारच्या आकारातील नोंदवह्या, बायडींग करणेचे असुन त्यासाठी खाली नमुद केलेल्या अटी व शर्तीस अधीन राहुन दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | तपशिल | आकार | पानी | संख्या | एकूण दर र.रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | जननी सुरक्षा योजना नोंदवही प्रा.आ.केंद्र स्तर | २३''X३६'' १/८ | १०० | ५०० | |
| २ | जननी सुरक्षा योजना नोंदवही उप केंद्र स्तर | २३''X३६'' १/८ | १०० | १०० | |
| ३ | आवक नोंदवही | १७''X२७'' १/४ | २०० | ५० | |
| ४ | मोजमाप पुस्तिका | १७''X२७'' १/४ | १०० | ७०० | |

### अटी व शर्ती

१) दरपत्रक सोबतच्या नमुन्या नुसारच सादर करावेत.

२) दरपत्रकासोबत संस्थेचा शॉप ॲक्ट रजिस्ट्रेशन दाखला / ग्रामपंचायत हद्दीत असेल तर सरपंच / ग्रामसेवक / ग्रामपंचायत यांचा दाखला, सेवा व वस्तू कर नोंदणी केली असलेबाबत प्रमाणपत्र आणि पॅन कार्ड सोबत सादर करावे.

३) विहित नमुन्यातील दरपत्रक दिनांक १९/१२/२०२२ रोजी पर्यंत दुपारी ३.०० पर्यंत समक्ष अथवा पोस्टाने पोहोच होईल अशा पद्धतीने सादर करावे. तद्नंतर प्राप्त होणारी दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

४) बायडींग हे नमुन्यानुसार आणि दिलेल्या मुदतीतच होणे आवश्यक आहे. बायडींग समाधानकारक न झाल्यास देयकाची अदायी होणार नाही. तसेच मुद्रणालयाच्या होणाऱ्या नुकसान भरपाईस व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी ठरवतील त्यानुसार दंडास आणि कायदेशीर कारवाईस निविदाधारक पात्र ठरेल.

५) बायडींगसाठी आवश्यक असणारे साहित्य मुद्रणालयाकडून पुरविण्यात येईल. सदरचे साहित्य मुद्रणालयातुन स्वखर्चाने घेऊन जाणेचा असुन नमुन्याप्रमाणे बायडींग झाल्यानंतर स्वखर्चानेच मुद्रणालयामध्ये कार्यालयीन वेळेत व दिवशी पोहोच करणेसह दर नमूद करावेत.

६) सिलबंद दरपत्रके उघडण्याची वेळेस आपला प्रतिनिधी अथवा आपण समक्ष हजर रहाणेचे आहे. त्यानुसार आपण उपस्थित न राहिलेस कोणतीही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

७) दरपत्रकामध्ये खाडाखोड करु नये, लखोट्यावर 'बायडींगचे दरपत्रक' असा उल्लेख असावा.

८) एक किंवा सर्वच दरपत्रक स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार, तसेच अटी व शर्तीमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करण्याचे अधिकार खाली सही करणार यांनी राखुन ठेवलेले आहेत.

९) दरामध्ये जीएसटी किंवा इतर करांचा समावेश केला जाऊ नये तो स्वतंत्र बिलामध्ये आकारावा.

११) सशर्त दरपत्रक स्विकारली जाणार नाही.

९/१२

प्रमुख नियंत्रक
सातारा जिल्हा परिषद मुद्रणालय, तथा
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
सातारा जिल्हा परिषद